आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र दुपारी १.३० वाजता

२ फेब्रुवारी  २०२३ – गुरुवार

**ठळक बातम्या**

- हिंडेनबर्ग संस्थेनं प्रकाशित केलेल्या अहवालावरुन संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे विरोधकांचा प्रचंड गदारोळ / गोंधळामुळे सभागृहाचं कामकाज दुपारी 2 वाजेपर्यंत स्थगित

- भारतीय अन्न महामंडळाच्या ई लिलावात पहिल्याच दिवशी  8 लाख मेट्रीक टन गव्हाची विक्री

- शाश्वत जीवनशैलीला व्यापक स्वरूप देण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचं केंद्रीय आयुष मंत्री सर्बानंद सोनोवाल यांचं जी-२० सदस्य देशांना आवाहन

- विधानपरिषदेच्या 5 मतदारसंघातल्या निवडणुकीची मतमोजणी सुरु

**आणि**

- शहरातलं वाढतं बांधकाम आणि मंदावलेल्या वाऱ्यांमुळे मुंबईच्या हवामानाच्या दर्जात घट

**<><><><><><>**

अदानी उद्योगसमूहाबाबत हिंडेनबर्ग संस्थेने प्रकाशित केलेल्या अहवालावरुन संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे विरोधकांनी प्रचंड गदारोळ केला. लोकसभेत काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि द्रमुकच्या सदस्यांनी सभागृहाचं कामकाज सुरु होताच याप्रकरणी चौकशीची मागणी करत हौद्यात धाव घेतली. सदस्यांनी आपापल्या जागी परत जावं असं सभापती ओम बिरला यांनी वारंवार सांगूनही हे सदस्य हौद्यातूनच

घोषणा देत राहिले. गोंधळामुळे कामकाज चालवणं अशक्य झालं तेव्हा सभागृहाचं कामकाज दुपारी 2 वाजेपर्यंत स्थगित करण्यात आलं.

राज्यसभेत अनेक सदस्यांनी स्थगन प्रस्तावाची नोटीस दिली होती. भारतीय आयुर्विमा महामंडळ, आणि सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांनी पैसा गुंतवलेल्या कंपन्यांचे समभाग बाजारात कोसळत असल्याबद्दल चर्चेची मागणी करणारा हा स्थगन प्रस्ताव होता. हा प्रस्ताव योग्य पद्धतीने मांडला नसल्याचं कारण देऊन  अध्यक्ष जगदीप धनखड यांनी तो फेटाळून लावला. तेव्हा काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, आप, समाजवादी पार्टी आणि इतर विरोधी पक्ष सदस्यांनी गदारोळ सुरु केला. अध्यक्षांनी सदस्यांना शांतता राथायला सांगितलं मात्र घोषणाबाजी चालूच राहिल्याने सभागृहाचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करावं लागलं.

**<><><><><><>**

अमेरिकेने सेमीकंडक्टर्सच्या क्षेत्रात भारतातील परिस्थितीजन्य तंत्रज्ञान अर्थात फॅब्रिकेशन इकोसिस्टमच्या विकासाला पाठिंबा दिला आहे. यासाठी उद्योग क्षेत्रात संयुक्तरित्या उद्योग आणि  भागीदारीला  प्रोत्साहन दिलं असून, दोन्ही देश यासाठी एका कार्य दलाची स्थापना करणार आहे. यामध्ये सेमीकंडक्टर मिशन, इंडिया इलेक्ट्रॉनिक्स सेमीकंडक्टर असोसिएशन आणि अमेरिका सेमीकंडक्टर इंडस्ट्री असोसिएशनचे प्रतिनिधी सहभागी होतील. अमेरिकेचे राष्टीय सुरक्षा सल्लागार जेक सुलविन तसेच भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल काल व्हाईट हाऊस इथं 'क्लिष्ट आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान' याविषयावर झालेल्या बैठकीत सहभागी झाले.

वा ॅशिंग्टन इथं सरकारी अधिकारी आणि विभिन्न संस्थांच्या अधिकाऱ्यांच्या उच्चस्तरीय बैठकीनंतर अनेक सामंजस्य करार करण्यात आले.दोन्ही देशांनी जेट

इंजिन,आर्टिलरी पध्दत आणि क्वांटम तंत्रज्ञानाचे महत्त्व ओळखून, दोन्ही बाजूंनी उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील सहभागासह क्वांटम समन्वय यंत्रणा स्थापन केली. संरक्षण उत्पादन क्षेत्रात, दोन्ही बाजूंनी परस्पर हिताच्या महत्त्वाच्या वस्तूंच्या संयुक्त उत्पादनावर लक्ष केंद्रित करण्याचे मान्य केले.

<><><><><>

संसदेच्या दोन्ही सभागृहात आज राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावर चर्चा सुरु होईल. लोकसभेत खासदार चंद्रप्रकाश जोशी प्रस्ताव मांडणार असून उदयप्रताप सिंह त्याला अनुमोदन देतील. राज्यसभेत खासदार के लक्ष्मण आभार प्रस्ताव मांडणार असून खासदार प्रकाश जावडेकर अनुमोदन देतील.

<><><><><>

यावर्षीच्या अर्थसंकल्पात फार्मा उद्योगासाठी ११ पूर्णांक ५ दशांश पट वाढ केल्याबद्दल रसायन आणि खते मंत्री मनसुख मांडविय यांनी केंद्रीय अर्थसंकल्पाचं कौतुक केल आहे. अमृत काळ अर्थसंकल्प उद्योगाला अधिक उंचीवर नेईल, अशी आशा मंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.वित्त मंत्रालयानं २०२२-२३ मधील १०० कोटी रुपयांच्या तुलनेत २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी औषध उद्योगासाठी १ हजार २५० कोटी रुपये दिले आहेत.

<><><><><>

भारतीय अन्न महामंडळाने देशांतर्गत खुल्या बाजारात पहिल्याच दिवशी 8 लाख मेट्रीक टन गव्हाची विक्री केली. देशातल्या 22 राज्यांमधे ई- लिलाव पद्धतीने ही विक्री झाली. केंद्रीय साठ्यातल्या एकूण 25 लाख मेट्रीक टन गव्हापैकी 22 लाख मेट्रीक टन गहू अन्न महामंडळानं लिलावाद्वारे विक्रीला काढला आहे. देशभरात गहू आणि गहूपिठाचे दर वाढत असल्याच्या पार्शवभूमीवर त्यावर नियंत्रण ठेवण्याकरता

हा लिलाव करण्यात येत असल्याचं केंद्रीय अन्न आणि नागरी पुरवठा मंत्रालयानं सांगितलं आहे. येत्या मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत दर बुधवारी हा लिलाव होणार असल्याचं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><><>

केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी, जलमार्ग आणि आयुष मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी जी-२० सदस्य देशांच्या प्रतिनिधींना शाश्वत जीवनशैलीला व्यापक स्वरूप देण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचं आवाहन केलं. आज सकाळी गुवाहाटी इथं जी-२० च्या पहिल्या शाश्वत वित्तीय कार्यगटाच्या बैठकीच्या उद्घाटनाच्या वेळी ते बोलत होते. जगानं स्वच्छ आणि हरित समाजासाठी काम केलं पाहिजे असं सांगताना, कार्बन फूट प्रिंट्स कमी करण्याचही आवाहन त्यांनी केलं . भारतानं आपल्या राष्ट्रीय विकासासाठी शाश्वत विकासाचा अवलंब केला असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. या दोन दिवसीय बैठकीत आम्ही हवामान कृतीसाठी शाश्वत वित्तपुरवठा आणि जगभरातल्या लोकांच्या कल्याणासाठी आणि समान विकासासाठीच्या अडचणी ओळखण्याचा प्रयत्न करू, आणि या उदात्त कृतीसाठी शाश्वत वित्त कसं जमवायचं याचा रोडमॅप या जी-२० संमेलनातून समोर येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

जी-२० चे सदस्य देश, अतिथी देश आणि विविध आंतरराष्ट्रीय संस्थांचे १०० हून अधिक प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित आहेत. दोन दिवसीय बैठकीत हवामानविषयक कृतीसाठी मुबलक संसाधनांची जमवाजमव करण्याच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी चार सत्रे होणार आहेत.

<><><><><><>

श्रीलंकेत पेट्रोलच्या दरात लिटरमागे 30 रुपये वाढ झाली सून आता ऑक्टेन 92 पेट्रोलचा दर 400 रुपये प्रतिलिटर झाला आहे. भारतीय कंपनी इंडीयन ऑईलची उपकंपनी असलेल्या लंका इंडीयन ऑईल कंपनीनं ही दरवाढ जाहीर केली आहे. श्रीलंकेतली दुसरी तेल कंपनी सिलोन पेट्रोलियम कॉर्पोरेशननेही ऑक्टेन 92 पेट्रोलच्या दरात वाढ केली असून त्यांचं उत्पादनही 400 रुपये प्रतिलीटर भावाने उपलब्ध आहे.

श्रीलंकेने वित्तीय तूट तातडीने कमी करण्याचा इशारा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने दिला असल्याने तिथे काटकसरीचे आणि उत्पन्न वाढवण्याचे निकराचे प्रयत्न सुरु आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या विधानपरिषदेच्या ३ शिक्षक आणि २  पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीला आज सुरुवात झाली. कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या मतमोजणीला नेरुळ इथं सुरुवात झाली असून,  आत्तापर्यंत ९८  मतपेट्या उघडण्यात आल्या आहेत.  ३० जानेवारीला पार पडलेल्या या निवडणुकीत कोकणातून ९१ पूर्णांक २० शतांश  टक्के इतके मतदान झालं होत. अमरावती पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीला बडनेरा इथल्या  नेमानी गोडाऊन इथं सुरुवात झाली आहे.अनेक उमेदवार मतमोजणी ठिकाणी दाखल झाले असून, दुपारी चार नंतर चित्र स्पष्ट होण्याचे संकेत आहेत. नाशिक पदवीधर मतदारसंघ निवडणूकीच्या मतमोजणीसही  सुरुवात झाली आहे. नाशिक पदवीधर मतदारसंघासाठी नाशिक विभागात ४९ पूर्णांक ३२ शतांश  टक्के मतदान झाले असून याची मतमोजणी सय्यद पिंप्री इथल्या गोदामात सुरू झाली आहे.

**<><><><><>**

३०४ एवढ्या हवामान गुणवत्ता निर्देशकांनुसार काल मुंबईतल्या हवेचा दर्जा अत्यंत खालावला असल्याची नोंद झाली आहे. कमी तापमान आणि मंदावलेले वाऱ्यांसह बांधकामाची कामे तसंच शहरातील संथ गतीनं होणारी वाहतूक यामुळे धुळीचं प्रदूषण वाढत असल्याचं मत तज्ञांनी व्यक्त केलं आहे. येत्या काही दिवसांत मुंबई आणि परिसरातील तापमानात पुन्हा एकदा घट होण्याची शक्यता हवामान तज्ञांनी वर्तवली आहे.

**<><><><><><>**

राज्यातील बाजार समित्यांमध्ये येणाऱ्या शेतकऱ्यांना अद्यावत सुविधा मिळाव्यात यासाठी सर्व बाजार समित्यांच्या पायाभूत सुविधांचा तपशीलवार आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई इथं दिले.

सह्याद्री अतिथीगृह इथं राज्याच्या पणन विभागाची आढावा बैठक मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल झाली तेव्हा ते बोलत होते.

काळाची गरज लक्षात घेऊन बाजार समित्यांचा पुनर्विकास, तिथं येणारे शेतकरी, मजूर, कामगार यांच्यासाठी सुविधा निर्माण कराव्यात असे निर्देशही शिंदे यांनी दिले.

**<><><><><><>**

बंगालच्या उपसागरावर निर्माण झालेलं कमी दाबाचं क्षेत्र श्रीलंकेच्या पूर्व किनाऱ्यापर्यंत पसरलं असून ते श्रीलंकेकडे सरकत आहे. परिणामी बेटाच्या बहुतांश भागात ढगाळ वातावरण राहील तसंच उत्तर, उत्तर-मध्य आणि पूर्व प्रांतांमध्ये १०० मिमी पेक्षा जास्त पाऊस पडण्याची आणि जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे.

**<><><><><><>**

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी काल वॉशिंग्टनमध्ये परराष्ट्र सचिव अँटनी ब्लिंकन यांची भेट घेतली. विविध जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवर

भारत-अमेरिका व्यापक जागतिक धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत कशी करता येईल त्यांनी विचारांची देवाणघेवाण केली.

एका ट्विटमध्ये श्री ब्लिंकन म्हणाले की, जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी अमेरिका भारतासोबत सहकार्य वाढवत आहे.अमेरिकेचे संरक्षण उपसचिव डॉ. कॅथलीन हिक्स यांनी श्री डोवाल यांची भेट घेतली. त्यांनी अमेरिका-भारत संरक्षण सहकार्य आणि प्रादेशिक सुरक्षा समस्यांसह अनेक विषयांवर चर्चा केली.

**<><><><><><>**

फिंगर बाउल मध्ये हात धुण्याची पद्धत हि मौखिक आरोग्याच्या दृष्टीनं अयोग्य असल्यानं,  दंत वैद्यांनी  ही पद्धत बंद करण्यासाठी जनजागृती करावी असं आवाहन राज्यपाल कोश्यारी यांनी केलं आहे. एक्सलन्स इन डेन्टिस्ट्री पुरस्काराच्या वितरण समारंभावेळी ते बोलत होते.  'मेडियुष' या दंतवैद्यांच्या संघटनेच्या वतीनं  हे पुरस्कार देण्यात आले असून, यावेळी महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ मुख अभियानाच्या बोधचिन्हाचं  तसंच  बोधवाक्याचं  राज्यपालांच्या हस्ते अनावरण करण्यात आलं .वैद्यकीय सेवा हा एक पवित्र पेशा असून त्याचे पावित्र्य टिकवून ठेवण्यासाठी डॉक्टरांनी प्रयत्न करावेत आणि रुग्णांना देव मानून त्यांची सेवा करावी असं आवाहनही यावेळी  राज्यपालांनी  केलं.

**<><><><><><>**

पाकिस्तानातला दहशतवादी अब्दुल रहमान मक्की ला संयुक्त राष्ट्रांनी दहशतवादी घोषित केल्याची नोंद भारताने घेतली असून संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेल्या यादीत मक्कीचं नाव समाविष्ट केलं आहे. हा सरकारी आदेश कालपासून तातडीने लागू झाल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने म्हटलं आहे.

**//<><><><><><>//**